दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १६ वे • अंक १४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.८ एप्रिल २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## कुर्ल्यात स्क्रॅप गोदामाला भीषण आग, कोणतीही जीवितहानी नाही

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पूर्व उपनगरातील कुर्ला सीएसटी रोडवर मोटर पार्ट्सच्या दुकानाला भीषण आग लागली आहे. या आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत. अग्निशमन दलाचे जवान आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. या आगीत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही. तसेच ही आग नेमकी कशामुळे लागली याबाबतही माहिती मिळालेली नाही.

या आगीच्या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, कुर्ला पश्चिम इथे असलेल्या गुरुद्वाराजवळ एक स्क्रॅप मार्केटच्या गोदामात ही आग लागली आहे. या आगीमुळे आसपास धुराचे लोळ दिसू लागले. हे धुराचे लोळ काही किलोमीटरच्या अंतरावरूनही सहज पाहता येतात, यावरून ही आग किती मोठी आहे याची कल्पना येते.

# मालमत्ता कराबाबत वेळ पडल्यास न्यायालयाचे दरवाजे ठोठावणार : बाळाराम पाटील

## जनतेवर लादलेला जिझीया कर कमी झाला नाही तर मुजोर सत्ताधाऱ्यांना धडा शिकविणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाविकास आघाडीचे नगरसेवक जनतेची भूमिका योग्यरित्या मांडत असताना पनवेल महानगरपालिकेच्या महापौरांनी गंभीर विषयासाठी घेतलेल्या महासभेत अयोग्य निर्णय घेत महाविकास आघाडीच्या नगरसेवकांना निलंबित करून आपलं तेच खरं करून दाखविण्याचा केविलवाणा प्रकार केला असल्याचे मत महाविकास आघाडीच्या सर्वपक्षीय नेत्यांनी शहरातील शेतकरी कामगार पक्ष कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केले.



यावेळी आमदार बाळाराम पाटील यांनी पनवेल महानगरपालिकेच्या महापौर यांच्यावर आपला निशाणा साधताना सांगितले की, लोकशाहीच्या नियमांना पायदळी तुडवत प्रशासनाबरोबर नगरसेवकांचे निलंबन केल्याने आम्ही महाविकास आघाडीच्यावतीने या निष्क्रिय महापौरांचा जाहीर निषेध करतो. मालमत्ता कराबाबत पनवेल महानगपालिकेच्यावतीने झालेल्या विशेष महासभेत पनवेल महानगरपालिका स्थापनेपासून पुढील पाच वर्षे कोणताही नवीन मालमत्ता कर लागू करु नये अशी महाविकास आघाडीच्यावतीने प्रमुख मागणी करण्यात आली होती. यावेळी सत्ताधारी व विरोधी पक्ष नेते यांच्यामध्ये गदारोळ पाहायला मिळाला. त्यामुळे महापौरांमार्फत महाविकास आघाडीच्या १५ नगरसेवकांचे निलंबन करण्यात आले. मुळातच आपलं ते खरं करण्याच्या नादात जनतेसमोर सत्ताधारी भाजपचे गोंडे उघडे पडल्यामुळे जनतेला सत्ताधारी भाजपच्या मनात नेमकं काय आहे हे कळलं असल्यामुळे आता या सत्ताधाऱ्यांची पळता भुई झाली आहे. जनतेवर लादलेला जिझीया कर जर कमी झाला नाही तर वेळ पडल्यास न्यायालयात जावू असा इशारा आ.बाळाराम पाटील यांनी दिला.

सिडकोच्या तुलनेत सत्ताधारी भाजप पक्ष आपल्या स्वार्थी स्वभावामुळे नागरिकांच्या खिशावर डल्ला मारून जास्तीचा कर लागू करतात आणि त्याला महाविकास आघाडीचा कायम विरोध राहणार असून सत्ताधाऱ्यांना लवकरच फेरविचार करायला लावणार असल्याचा इशारा यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आला.

महाविकास आघाडीचे नगरसेवक जनतेची भूमिका योग्यरित्या मांडत असताना महापौरांनी अयोग्य निर्णय घेत नगरसेवकांना निलंबित केले असल्याचा आरोप आमदार बाळाराम पाटील यांनी केला. तसेच, कुठलीही सुख सुविधा न देता महापालिका मालमत्ता कर लावायला बघते हे अत्यंत चुकीचे असून, याबाबत शासनदरबारी नक्कीच न्याय मागणार असल्याचं बबन पाटील यांनी सांगितले.

सर्वांना समान कायदा लागू करणे गरजेचे असताना फक्त महाविकास आघाडीबाबत असलेला राग व्यक्त करण्यासाठी सूडबुद्धीने ही कारवाई करण्यात आली असल्याचे मत नगरसेवक गणेश कडू यांनी व्यक्त केले.

यावेळी नगरसेवक गणेश कडू यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना प्रती महिना ४० पैसे प्रति स्क्वेअर फूट असा मालमत्ता कर आकारला जात असतो, तसेच काही अंशी अधिक मात्र समतोल राखण्यात कर ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आकारला जात आहे. असे असताना मग पनवेल महानगरपालिका कोणत्याही सुविधा न पुरविता अवाजवी कर का लादत आहे? असा सवाल उपस्थित करून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांवर ज्या पद्धतीने सामान्य कर लादला जात आहे तीच पद्धत पनवेल महानगरपालिकेमध्ये राबविण्यात आल्यास नागरिकांना अधिक भार पडणार नाही. आणि तोही आकारताना नव्या धोरणानुसार यापुढच्या वर्षांसाठी आकारला जावा, असा सूचक सल्लाही यावेळी नगरसेवक गणेश कडू यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून पालिका प्रशासनासह सत्ताधाऱ्यांच्या तसेच जनतेच्या समोर आणून दिला आहे.

## संक्षिप्त...

### 'तर, केंद्र सरकार व भाजपाला गंभीर परिणाम भोगावे लागतील'

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबईः महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरात करोनाच्या वाढत्या रुग्णसंख्येने रौद्ररुप धारण केले आहे. देशात दररोज १ लाखांपेक्षा जास्त लोकांना करोनाची बाधा होत आहे. वाढत्या करोना संक्रमणाला आळा घालण्यासाठी लसीकरणाशिवाय पर्याय नाही हे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्षाने करोना लसीकरणासाठी वयोमर्यादेची अट शिथील करून राज्यातील १८ वर्षावरील सर्वांना कोरोना लस देण्याची मागणी केली होती. देशातील डॉक्टरांची सर्वात मोठी संघटना इंडियन मेडिकल असोसिएशननेही पंतप्रधानांना पत्र लिहून हीच मागणी केली आहे. पण केंद्र सरकरने ही मागणी अमान्य केली आहे. १८ वर्षांवरील सर्वांच्या लसीकरणाला परवानगी नाकारून केंद्र सरकार देशाला करोनाच्या खाईत ढकलत आहे, असा घणाघात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, 'केंद्र सरकारच्या आडमुठ्या आणि लस सार्वत्रिकरणास अडवणूकीच्या धोरणामुळे देशातील केवळ तीन राज्येच लोकसंख्येच्या फक्त ५% लसीकरणापर्यंत पोहचली आहेत, हा अतिशय गंभीर आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने घातक प्रकार आहे. आत्तापर्यंत केवळ ८.३० कोटी लोकांनाच लस देण्यात आली आहे. सर्वांना लस न देता प्राधान्य गटांनाच लस देण्याची केंद्र सरकारची भूमिका शास्त्रीय नाही. ज्यांना पाहिजे असेल, ज्यांची इच्छा आहे त्याला लस दिली पाहिजे. करोनाची लस खाजगी हॉस्पिटलसह सर्वत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून दिली पाहिजे.

## पनवेलमध्ये लसीकरण काही दिवसांकरीता बंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सध्या कोविड १९ लसीकरणाच्या तिसरा टप्पा सुरू आहे. मात्र लसींचा तुटवडा असल्याकारणाने गुरुवार ८ एप्रिल पासून पनवेल मध्ये काही दिवस लसीकरण कार्यक्रम बंद करण्यात आला आहे.

सध्या कोव्हॅक्सीन आणि कोविशिल्ड अशा दोन प्रकारच्या लस नागरिकांना देण्यात येत आहे. कोविशिल्ड लसींचा साठा उपलब्ध नसल्याने लसीकरण सुविधा काही दिवसांसाठी बंद करण्यात आली आहे.

कोव्हॅक्सीन दुसरा डोस काही प्रमाणात उपलब्ध आहे परंतू याचा पहिला डोस १६ मार्चपासून देण्यास सुरूवात केली आहे, याचा दुसरा डोस १६ एप्रिलपासून देण्यास सुरूवात होईल.

पनवेल महानगरनगरपालिका क्षेत्रात सद्या २१ लसीकरण केंद्र कार्यरत आहेत. यामध्ये नऊ शासकीय आणि बारा खाजगी लसीकरण केंद्रामध्ये हे लसीकरण चालू आहे. आज पर्यंत




एकुण ६३२ लसीकरण सत्रे घेण्यात आली आहेत.

यामध्ये आत्ता पर्यंत एकुण लसीकरण ६३८७९ लसीकरण करण्यात आले आहे. रोज सरासरी २५०० लसीकरण होत असून लसींचा साठा उपलब्ध झाल्यावर पुन्हा एकदा लसीकरणाचे काम सुरळीतपणे चालू करण्यात येईल. अशी माहिती महानगरपालिकेच्या वैद्यकिय आरोग्य विभागाने दिलेली आहे.

## गटारावर विकासाचा हातोडा ; उरण नगर पालिकेचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

रहिवाशांच्या घरातील तसेच पावसाळ्यातील पाण्याचा निचरा योग्य प्रकारे व्हावा यासाठी उरण नगर पालिकेने लाखो रुपये खर्च करून नव्याने गटारांची कामे मार्गी लावली आहेत. परंतु सदर गटारांच्या संरक्षण भितीच उध्दवस्त करण्यासाठी विकासकांनी पुढाकार घेतला आहे. असे भयानक चित्र आपणा बाजार ते गांधी चौक रस्त्यावरून मार्गक्रमण करताना नजरेस पडते. तरी गटाराच्या बांधकामांवर हातोडा चालविणाऱ्या विकासावर कारवाई करावी अशी मागणी रहिवाशी नागरीक व्यक्त करत आहेत.



उरण नगर पालिकेवर भाजपा पक्षाची एक हाती सत्ता आहे. सत्तधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी उरण शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून घेतला आहे. आणि येथील रहिवाशांना, प्रवाशी नागरीकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी शहरातील काँक्रीटचे रस्ते, पाण्याचा निचरा होणारी गटारे, गार्डनचे सुशोभीकरण तसेच इतर महत्त्वाची कामे मार्गी लावत आहेत. परंतु अशा विकास कामांच्या देखभालीकडे सध्या उरण नगर पालिकेचे बांधकाम विभाग यांना लक्ष केंद्रित करण्यासाठी वेळ मिळत नसल्याने आज सर्रासपणे

..../२

## कोरोना काळात ई-पॉज मशिन बंद करण्याची रास्त भाव धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेता वेल्फेअर असोसिशन पनवेलची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील धान्य दुकानदारांचे माहे एप्रिल २०२१ चा मासिक धान्य नियतन कमी करून शासनाने लाभार्थी कार्डधारकांचे धान्य कोट्यात कमालीची कपात केलेली आहे. या कोरोनाच्या बंद काळात कमीत कमी दुकानदार यांच्याकडून कार्डधारकांना उपजिविकेसाठी धान्य मिळण्यांची शाश्वती असते, आपणांस व शासनास विनंती की शासनाने कार्डधारकांचा धान्याचा कोटा कमी करू नये अन्यथा ग्रामीण भागातील जनता रस्त्यावर येईल, वेळ प्रसंगी 'भूकबळीची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत योग्य तो जनहितार्थ निर्णय घेवून कोरोना महामारी बंद काळात ई पॉज



मशीनवरील बायोमेट्रीक थंबची अनिवार्य सक्ती पध्दत तत्काळ बंद करणे आवश्यक व गरजेचे आहे, अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी केली आहे.

देशात व महाराष्ट्रात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने महाभयंकर प्रादुर्भाव होत असून रूग्णसंख्येने आतापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडून निघाले आहेत. कोरोना व्हरररसच्या प्रादुर्भावाने नवे रूग्णा आणि संक्रमणामुळे होणारे मृत्यू यांच्या वाढत्या आकडेवाढीमुळे सध्या दुकानदार व जनतेमध्ये दहशतीचे वातावरण आहे. कोरोना महासंकट सुरू झाल्यापासून सध्या शासनाने बायोमेट्रीक पध्दतीचा वापर सुरू केल्यामुळे बहुतेक ठिकाणी रास्त भाव धान्य दुकानदार व लाभार्थी कार्डधारक यांच्यामध्ये बायोमेट्रीक पध्दतीची सक्ती सुरू आहे. शासनाने बायोमेट्रीक पध्दतीने (थंब) अंगठे असतील तरच धान्य वितरण करावे, असे स्पष्ट संकेत पुरवठा

..../२

## अत्यावश्यक सेवेशिवाय सुरु असलेल्या दुकानांवर महानगरपालिकेची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी 'ब्रेक द चेन 'अन्वये राज्य शासनाने अनेक निर्बंध लादले आहेत. अत्यावश्यक सेवांची दुकाने सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. या शिवाय इतर दुकाने सुरू असतील त्यावर पालिकेच्यावतीने कडक कारवाई करण्यात येत आहे. बुधवारी महापालिकेने खारघर, कामोठे, खांदा कॉलनी आणि पनवेल मध्ये अशा दुकानावर काही ठिकाणी दंडात्मक तर काही ठिकाणी सील करण्याची कारवाई केली.

राज्यात सर्वत्र कोरोना विषाणूचा प्रसार वाढत आहे. या पार्श्वभूमीवर करोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी 'ब्रेक द चेन' अन्वये राज्य शासनाने अनेक

..../२




## गोवा राज्य निर्मित अवैध विदेशी मद्यसाठ्यासह एर्टीगा गाडी जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.२ यांना मिळालेल्या माहितीद्वारे खारघर सेक्टर २० पनवेल येथे गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याच्या वाहतुकी दरम्यान छापा टाकला असता एका एर्टीगा कार नं.एमएच-४६-एएल-४३५३ मधून गोवा निर्मित विदेशी मद्याच्या साठ्यासह तीन आरोपींना अटक करून ५ लाख ८७ हजार ८३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दरम्यान आरोपी मुजावर अली रोजन अली शेख (रा.खारघर), वाजिद नुर सय्यद

..../२



## रोजगार बंद झाल्याने व्यापारी वर्ग अडचणीत ; शासनाच्या निर्णया विरोधात सर्वत्र आक्रोश



**दै.रायगड नगरी । रोहा**

राज्यात कोरोनाची रुग्णसंख्या वाढत असल्याने महाराष्ट्र सरकारने मिनी लॉकडाऊनचा निर्णय घेतला. शासनाच्या निर्णयाची अंमलबजावनी करीत रोहा नगरपरिषद व पोलीस प्रशासनाने रोह्यात किराणा, कपडा, सलून, वाईन शॉप, हार्डवेअर, सोना चांदीची दुकाने बंद करण्याची सक्ती केली. व्यापा-यांनी बळजबरिने दुकाने बंद केली. दुकाने पुर्णत: बंद झाल्याने व्यावसाय बुडणार, कामगारांचे पगार कुठून देणार असा प्रश्न व्यापा-यांनी पडला असून त्यांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बंदच्या निर्णयाविरोधात व्यापारी वर्गातून संताप व्यक्त होत आहे.

या बंदमुळे नागरिकांचे रोजगार बुडाले, व्यापा-यांपुढे जागेचे भाडे, लाईटबील, कामगारांचे पगार देण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला. महत्वाचे म्हणजे दुकानात भरलेला माल तसाच पडून राहिल्याने फार मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. मिनीलॉकडाऊनमुळे हॉटेलमध्ये केवळ पार्सल सेवा सुरु ठेवली असली तरी हॉटेलमध्ये गीऱ्हाईकच फिरकत नसल्याचे मत पहिल्याच दिवशी हॉटेलमालकांनी व्यक्त केले. त्यामुळे त्यांचीही आर्थिक गणिते बिघडली आहेत.

मागीलवर्षीच्या कोरोना लॉकडाऊनमुळे तब्बल आठ महिने हातावर पोट असणारे व

..../२

# घातचक्राचा विळखा!

'प्लीज माझ्या बाबांना सोडून द्या हो...' अशी आर्त हाक देत रडणाऱ्या पाच वर्षांच्या चिमुकलीच्या व्हिडिओने सध्या अनेकांच्या हृदयाला पाझर फोडला आहे. छत्तीसगडमध्ये अलीकडेच झालेल्या माओवादी हल्ल्यानंतर न गवसलेल्या राकेश्वरसिंह मिन्हास या 'कोब्रा कमांडो'ची ही मुलगी आहे. 'माझ्या पतीने दहा वर्षे देशाची सेवा केली. त्यांना सरकारने सुखरूप परत आणावे. माझ्या भावना पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांपर्यंत पोहोचवा' ही अपहृत जवानाच्या पत्नीची अपेक्षा आहे. बिजापूरमधील घातक हल्ल्यात २२ जवान शहीद झाले. अनेक माओवादीही मारले गेल्याचा पोलिसांचा दावा आहे. पोलिस-माओवादी चकमकीला आपल्या देशात ठराविक काळानंतरच्या घटनाक्रमाचे स्वरूप आले आहे. स्वत:ची भूमिका पार पाडण्याची घाई प्रत्येकातून झळकते. जुन्या हल्ल्याचे दु:ख हलके होण्यापूर्वी नवा आघात केला नाही, तर दहशत कमी होईल ही भीती माओवाद्यांना छळते. दरारा कायम राखण्याची घाई त्यांना स्वस्थ बसू देत नाही. आधीच्या चुकांची कल्पना असतानाही जंगल प्रदेशातील कारवाईची जलदगती पोलिसांचा पिच्छा पुरवते. अनेक बळींनंतरही यंत्रणेला शहाणपण येत नसल्याचा साक्षात्कार नवी चकमक देऊन जाते. राजकीय पक्षांवर आरोप-प्रत्यारोपाचा उपचार उरकण्याची जणू सक्तीच असते. 'जवानाचे हौतात्म्य वाया जाणार नाही हा विश्वास बाळगा' हा केंद्रीय गृहमंत्र्यांचा दिलासा नेहमीच्या पठडीतील आहे. 'स्वखुशीने माओवाद्यांकडून हुतात्मा व्हायला आपले जवान म्हणजे तोफांची बारूद नाही', अशी टिपणी विरोधकांकडून झाली. गुप्तचर यंत्रणेचेच्या अपयशावरही बोट ठेले गेले. आम्ही अपयशी असतो तर इतक्या माओवाद्यांचे मृतदेह कसे दिसले असते, असा प्रतिप्रश्न करीत केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या (सीआरपीएफ) महासंचालकांनी त्यांची भूमिका अविलंब स्पष्ट केली. घातपातानंतरचा हा अनुक्रम दुर्दैवी असला तरी त्याची चौकट सरावाची आहे. अपहृत जवानाच्या सुटकेसाठी आता आश्वासनांची सरबत्ती होईल. महाराष्ट्रात अनेक वर्षांपूर्वी राज्यमंत्री धर्मरावबाबा आत्राम यांचे माओवाद्यांनी केलेले अपहरण गाजले होते. गेल्या महिन्यात कालवश झालेले 'एनकाउंटर' कादंबरीचे लेखक ॲड. एकनाथ साळवे यांची त्या सुटकेत महत्त्वाची भूमिका होती. अपहृतांचा जीव दोन्ही बाजूंच्या विश्वासात अडकला असतो. घातचक्रानंतर तो विश्वास कमावणे जिकिरीचे असते. अत्याधुनिक शस्त्रांसह आकस्मिक हल्ला ही माओवाद्यांची रणनीती आहे. चाळीस वर्षांत या डावपेचांतून त्यांनी शेकडो बळी घेतले. जवानांचे मनोधैर्य कमी करणे आणि अमानुष क्रौर्यातून गावकऱ्यांना धास्तावून सोडणे ही त्यांची जुनी आखणी आहे. बिजापूर आणि सुकमा जिल्ह्यांत सुरक्षा दलांनी नक्षलविरोधी मोहीम सुरू केली होती. दोन हजारांहून अधिक जवान मोहिमेत असतानाही वरचष्मा मात्र माओवाद्यांचा होता. आकस्मिक चकमकीत तशीही लपलेल्या गनिमांचीच सरशी होते. 'टॅक्टिकल काउंटर अफेन्सिव्ह कॅम्पेन' (टीसीओसी) अंतर्गत चढाई करणे ही माओवाद्यांची रीत आहे. नव्या साथींच्या 'तयारी'साठी ही त्यांची मोहीम असते. या 'स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर'चा अंदाज असतानाही जवान गाफील राहिले का? जंगलात ओढून जवानांची डोकी ठेचणे आणि अपप्रचारात अडकवून शहरी युवकांची डोकी भडकावणे, असे दुहेरी युद्ध माओवाद्यांनी आरंभिले आहे. आदिवासी, गरीब गावकऱ्यांचा पुळका हे त्यांचे वरपांगी चित्र असून नव्या कारवाईतून जुन्या अमानुषतेचा विक्रम मोडणे हा त्याचा अजेंडा आहे. लग्नमांडवात घुसून छातीत गोळ्या घालताना त्यांची आदिवासींविषयीची करुणा लुप्त होते. भर बाजारात गळा चिरताना त्यांना गावकऱ्यांच्या वेदनांचा विसर पडतो. दिवसेंदिवस कमी होत चाललेला ग्रामीण पाठिंबा हा त्यांच्या चिंतेचा विषय आहे. अशा स्थितीत जवानांवर हल्ला करून थेट सरकारची कोंडी करणे त्यांना देशव्यापी प्रसिद्धीसाठी पूरक ठरते. हा डाव त्यांच्यावर उलटवायचा असेल तर ग्रामीण भागात पोलिसांविषयी आस्था निर्माण करणे गरजेचे आहे. त्यासाठी पोलिसांनीही अनेक संस्थांना हाताशी धरून उपाययोजना सुरू केली आहे. नक्षलग्रस्त राज्यांचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलिस महासंचालक आणि केंद्रीय मंत्र्यांच्या समन्वय बैठकांवर आधीच्या काळात भर होता. सध्याच्या सत्ताकेंद्राने तो पायंडा दूर सारला आहे. राजकीय इच्छाशक्ती हवी. गुप्तचरांचे जाळे वाढवून प्रभावी पोलिस कारवाई पण हवी. त्याच बरोबरीने शहरी भागात उगाळल्या जाणाऱ्या ग्रामीण कणवेमागील नक्षलवाद्यांचा छुपा हेतू जगापुढे आणायला हवा. मोठ्या हल्ल्यांनंतर आरोप-प्रत्यारोपांची घाई टाळणे हादेखील त्यातील महत्त्वाचा टप्पा आहे. २२ जवानांचे बळी गेल्यानंतर सीआरपीएफने चुका करू नये असे एकीकडे सांगायचे आणि इतरांनी मात्र आरोपांचे नाटक रंगवायचे हे योग्य नाही. जवानांचा जीव नक्षलवाद्यांच्या गोळीने नव्हे, तर जनतेतील अविश्वासाने जातो हे तथ्य तातडीने लक्षात घेण्याची ही वेळ आहे. प्रत्येक नागरिक स्वत:ची जबाबदारी ओळखणार नाही, तोपर्यंत घातचक्राचा विळखाही सुटणार नाही.

# सिडको वसाहतीत कचरा वर्गीकरण सक्तीची ; सिडको स्वच्छता, आरोग्य विभागाकडून पोस्टरद्वारे जनजागृती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

इतर सिडको वसाहतीप्रमाणे करंजाडे सिडको वसाहतीच्या हद्दीतील सर्व सोसायटय़ांनी ओल्या व सुक्या कचऱ्याचे वर्गीकरण करण्यास सुरुवात करावी. त्यानंतर ज्या सोसायटय़ा वर्गीकरण करणार नाहीत, त्यांचा कचरा उचलण्यात येणार नाही, असा इशारा सिडकोच्या स्वच्छता आरोग्य विभागाकडून दिला आहे. तसेच वसाहतीतील सर्व सोसायट्याना कळविले आहेत. तसे जनजागृती असलेले स्टिकर सोसायट्या परिसरात लावले असल्याची माहिती सिडकोच्या स्वच्छता विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली.




सिडकोने नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, उलवे, द्रोणागिरी या ठिकाणी नोड विकसीत केले आहेत. नवीन पनवेल आणि कळंबोली या वसाहती सर्वात जुन्या असुन त्यापाठोपाठ खारघर, कामोठे तसेच आता नव्याने विकसित होत असलेले करंजाडे वसाहत विकसित होत आहे. सिडकोच्या वसाहतीमध्ये कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची समस्या भेडसावत आहे. यामुळेच सिडकोच्या स्वच्छता आरोग्य विभागाकडून ओला व सुका कचरा वेगळा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. वर्गीकरण न केलेल्या सोसायट्यांमधील कचरा न उचलण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार कचरा वर्गीकरणावर विशेष लक्ष दिले आहे. सिडकोच्या वसाहतीमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. नियमित स्वच्छता मोहिमा राबविल्या जात आहेत. नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी वारंवार सूचना करूनही वर्गीकरण केले जात नसल्याने आता कडक भूमिका घेण्यास सुरवात केली आहे. ओल्या व सुक्या कचर्यासाठी वेगवेगळ्या रंगाच्या कचराकुंड्या देण्यात आल्या असून हिरव्या रंगाच्या कचरा कुंडीत ओला कचरा व निळ्या रंगाच्या कचरा कुंडीत सुका कचरा वेगवेगळा ठेवणे अपेक्षित आहे. सुक्या कचर्यामध्ये विशेषत्वाने बॅटरी सेल, तारा, धातू खिळे, थर्माकोल, कागद, प्लास्टिक पिशव्या, रबर, काच व काचेच्या बाटल्या अशा वस्तूंचा समावेश होतो. तर ओल्या कचर्यात भाजीपाल्याचा कचरा व उरलेले अन्न, चहापत्ती, फळभाज्यांचे अवशेष, अंड्यांचे कवच, नारळ, शहाळी, लाकूड, केस, नखं आदी वस्तूंचा समावेश होतो. हा ओला व सुका कचरा नागरिकाच्या घरापासूनच वेगवेगळा ठेवणे अपेक्षित असून यादृष्टीने नागरिकांची मनोभूमिका तयार करण्यावर विविध माध्यमातून भर दिला जात आहे. त्यानुसार करंजाडे वसाहतीतील विविध सोसायटयांमध्ये कचरा वर्गीकरण करण्याबाबत आपला कचरा आपली जबावदारी अश्या जनजागृती पोस्टर लावले आहेत. त्याचबरोबर कचरा वर्गीकरण केलेल्या ओल्या कचऱ्याचीच वाहतूक करण्यात येईल असे सिडकोच्या स्वच्छता आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ नुसार आपल्या गृहनिर्माण संस्थेत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे ओला व सुका असे वर्गीकरण करून शक्यतो ओल्या कचऱ्यापासून आपल्या इमारत स्तरावर खतनिर्मिती करावी, सुका कचरा स्वतंत्र कुंडीमध्ये ठेवावा. वर्गीकरण केलेल्या ओल्या कचऱ्याचीच वाहतूक करण्यात येईल.

**- जी.डी.म्हस्के - आरोग्य निरीक्षक**
**सिडको, नवीन पनवेल**

# उरण तालुक्यात कोरोनाचे ४० नवे रुग्ण

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात कोरोना संसर्गजन्य विषाणूचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात वाढला असून काल कोरोनाच्या ४० नव्या रुग्णांची नोंद झाली आहे. तर विद्यमान १६० कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या झाली आहे. तर २३ रुग्ण कोरोना मुक्त झाले आहेत. उरण शहरासह तालुक्यातील ग्रामीण परिसरातही कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या व्हायरसने मोठ्या प्रमाणात डोके वर काढले आहे. उरण शहरासह संपूर्ण तालुक्यात कोरोना संसर्गाची काळजी घेण्याबाबत शासनाच्या वतीने नाक्या नाक्यांवर स्पिकरद्वारे प्रबोधन करण्यात येत आहे.मास्क लावणे,सुरक्षित अंतर राखणे,सॅनिटायझरचा वापर करणे अत्यावश्यक असल्याचे सांगण्यात येत आहे.कोरोना संसर्ग अधिक प्रमाणात फोफाऊ लागला आहे.सर्वच नागरिकांनी आपापल्या कुटुंबाची काळजी घ्यावी व कामाशिवाय घराबाहेर पडू नये असे आवाहन उरणचे तहसिलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**




# प्राणी,पक्षाची तहान भागविण्यासाठी नैसर्गिक स्त्रोतातून पाणवठे केले तयार

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

जंगलांना लावण्यात आलेल्या वनव्यामुळे आणि दिवसेंदिवस तापमानात झालेल्या वाढीमुळे पक्षी आणि प्राण्यांना पाण्याचा तुटवढा भासू लागला आहे.त्यामुळे त्यांची तहान भागविण्यासाठी वन्यजीव निसर्ग संस्था आणि वनविभाग एकत्र येऊन जंगलातील नैसर्गिक पाण्याचे स्रोत खुले करून पाणवठे तयार करण्याचा माणस आखला असून त्याची सुरवात आज चिरनेर च्या पोंडा परिसरातील पेरीच्या पाण्याच्या ठिकाणा पासून करण्यात आली आहे.



उरण तालुक्यातील वन्यजीव निसर्ग संरक्षण सर्प मित्र संस्था ही गेले एकवीस वर्षे निसर्ग आणि निसर्गातील जीव वाचविण्यासाठी धडपडत आहे.गेल्या २१ वर्षात या संस्थेने अनेक पक्षी प्राणी सापांना जीवदान देण्याचे काम केले आहे.आणि त्यांना या कामात वनविभागाने नेहमी सहकार्य केले आहे.आज या संस्थेने माणस आखला आहे की कोणताही पक्षी प्राणी निसर्गातील जीव पाण्यावाचून वंचित राहू नये. कारण जीव जीवस्य जीवनम प्रत्येक जीव जीवावर अवलंबू असतो.

मागील महिन्यात याच डोंगर परिसराच्या वरच्या बाजूला लागलेल्या वनव्यामुळे पक्षी प्राणी निसर्गातील जीव अस्ताव्यस्त झाले आहेत.त्यांची वस्ती स्थाने पूर्ववत करण्यासाठी ते धडपडत आहेत.त्यातच त्यांना पाण्याचा ही तुडवडा भासत आहेत.हे लक्षात आल्यावर वन्यजीव निसर्ग संस्थेने आणि वनविभागाने जंगलातील मातीच्या ढिगाऱ्याखाली असणारे नैसर्गिक पाण्याचे स्रोत खुले करून पाणवठे तयार करण्यास सुरुवात केली आहे. जंगलात या पाणवठ्यावर स्थायी आणि स्थलांतरित पक्षी प्राणी आपली तहान आनंदाने भागवतील हाच खरा आनंद आमच्या संस्थेला मिळेल अशी प्रतिक्रिया संस्थेचे कार्याध्यक्ष काशीनाथ खारपाटील यांनी व्यक्त केली.

हा पाणवठा तयार करण्यासाठी मातीचा ढिगारा बाजूला करून मोठे छोटे दगडाचा वापर करुन जवळजवळ सात फूट लांब आणि तीन फूट रुंद बांधण्यात आला असल्याचे उपाध्यक्ष आनंद मढवी यांनी सांगितले . जंगलातील प्रत्येक जीव महत्वाचा आहे तो वाचणे गरजेचे आहे.आणि जंगलही वाचणे गरजेचे आहे .जंगलेच राहिली नाही त्यामधील पशु पक्षी जिवंत राहिले नाही तर मनुष्य प्राणी ही नष्ट होऊ शकतो त्या साठी हे आमचे कार्य सतत निरंतर सुरू ठेवू .असे संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी वन्यजीव निसर्ग संरक्षण सर्पमित्र संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी,उपाध्यक्ष आनंद मढवी ,महेश भोईर संस्थेचे सदस्य कैलास मढवी, मयूर मढवी,संतोष पाटील, विनीत मढवी,बाळा मढवी,सुनिल नाईक, संस्थेचे कार्याध्यक्ष काशिनाथ खारपाटील वनपाल राऊतराय वनरक्षक सनी ढोले, मेजर जी एस बोरसे , संतोष इंगोले आदी उपस्थित होते.

# सुधागडात पाणी समस्येवर मात करण्यासाठी वऱ्हाड गावातील ग्रामस्थांची एकजूट

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली सुधागड सह जिल्ह्यातील अनेक भागात उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई ची समस्या भेडसावू लागली आहे. गावातील पाणी प्रश्न मार्गी लागावा यासाठी सुधागड तालुक्यातील वऱ्हाड मधील ग्रामस्थांनी एकत्र येऊन श्रमदानाने अंबा नदीवर बांधला आहे. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी गावकरी एकवटले, व श्रमदान करून जलसंपदा अधिक बहरवली. ग्रामस्तांनी आपल्या या कृतीतून पाणी समस्येवर मात कशी करावी याची प्रेरक शिकवण दिलीय.

या बंधाऱ्यामुळे नदीचे पाणी साठवून राहणार आहे. त्यामुळे दैनंदिन वापरासाठी व गुरांना आणि इतर प्राण्यांना पिण्यासाठी या पाण्याचा उपयोग होणार आहे. असे भास्कर दुर्गे यांनी सांगितले. बंधारा बांधण्यासाठी नदीच्या किनारी असलेली माती सिमेंटच्या पोत्यांमध्ये भरण्यात आली. आणि ही पोती बंधारा बांधण्यासाठी वापरण्यात आली. या उपक्रमात ग्रामस्थ व तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

या श्रमदान मोहिमेत विनोद अधिकारी, अरुण सुतार, उदय सुतार, किरण दुर्गे, शुभम देशमुख, अमोल साखरे, विठ्ठल तेलंगे, वैभव, तुषार, आकाश, नरेश, रुपेश, उमेश, जयेंद्र, राजेंद्र, जितेंद्र, ओंकार, गौरव, सागर, संजय, नितीन, स्वप्नील, रोशन सर्व खंडागळे हे तरुण व ग्रामस्थ सहभागी झाले होते.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## गटारावर विकासाचा हातोडा

रस्ते, साईट पट्टी खोदणे ही कामे सुरू आहेत.

त्यातच पावसाळ्याला दोन महिनेचा कालावधी सिल्क असताना विकासकांनी आपल्या सोयीनुसार नगर पालिकेने लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या गटारावरच्या बांधकामांवर हातोडा चालविण्यास सुरुवात केली आहे. यासंदर्भात हातोडा चालविणाऱ्या इसमाला विचारणा केली असता, त्यांनी सांगितले की आमचे शेठ तथा मालक आणि उरण नगर पालिकेच्या बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी गटारे तोडण्यासाठी सांगितले आहेत. त्यामुळे पावसाळ्यात गटाराचे पाणी रस्त्यावर आले तर कोणी ही आरडाओरड करु नये हे मात्र खरे आहे.

यासंदर्भात उरण नगर पालिकेचे बांधकाम विभाग अभियंता अनुपकुमार कांबळे यांच्या कडे विचारणा केली असता त्यांनी सांगितले की आम्ही बांधकाम विभागाकडून कोणालाही सदर कामासंदर्भात परवानगी दिली नाही. जर हे खरे असेल तर पाहणी करतो.

## ई-पॉज मशिन बंद करण्याची मागणी

अधिकारी यांच्याकडून अंमलात आणण्यासाठी सक्ती करण्यांत येत आहे.

सध्या कोरोना माहामारीचे दुस यांदा महाभयंकर संकट आल्यामुळे संपूर्ण शासकीय यंत्रणा राष्ट्रीय आपत्तीशी दोन हात करण्यांस आप आपल्या कुवतीने सज्ञ होत आहे. दुकानदार सुध्दा आपल्या पध्दतीने कोरोना महामारीचा सामना करीत आहे. अशा 'परिस्थितीत बायोमेट्रीक मशीनवर (थंब) अंगठयाची सक्ती केली तर कोरोनाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणांत वाढण्यांची शक्यता नाकारता येत नाही. लाभार्थी कार्डधारक हे गरीब स्तरावरील असल्यामुळे त्यांना कामधंदयासाठी अनेक ठिकाणी जावे लागते, त्यांचा सतत संपर्क असल्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव होण्यांची दाट शक्यता आहे. तसेच आपल्या सारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व कल्याणकारी सरकारने कमीत कमी कोरोनाच्या दुसऱ्या पर्वात बायोमेट्रीक अंगठयाची सक्ती करू नये, अशी तमाम कार्डधारकांची आणि धान्य दुकानदारांची माफक मागणी आहे.

## दुकानांवर महानगरपालिकेची कारवाई

निर्बंध लादले आहे. साथरोग प्रतिबंधात्मक अधिनियम १८९७ च्या कलम दोन अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार अत्यावश्यक सेवांची दुकाने सुरू ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे. या शिवाय इतर दुकाने सुरू असतील त्यावर पालिकेच्यावतीने कडक कारवाई करण्यात येत आहे.

खारघर येथील विभाग 'अ' सेक्टर ७ हिरानंदानी येथील अत्यावश्यक सेवेशिवाय उघडी असणाऱ्या दुकांनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. तसेच ब्युटीफुल पार्लर, सील करण्यात आले. पनवेल प्रभाग 'ड' मधील कनक सुझुकी, आर लाईट, रतन टीव्हीस, कनक ऑटोमोबाईल, नमन बॅटरी ही दुकाने सील करण्यात आली. प्रभाग समिती 'क' कामोठे येथील चहाचे दुकान सील करण्यात आले. तसेच काही दुकानांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. प्रभाग ब मधील, खांदा कॉलनी येथील सलुनवर सील करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात कोरोना रूग्णांच्या संख्येत मोठी वाढ होताना दिसत आहे. कोरानाचा वाढता प्रसार रोखण्यासाठी महानगरपालिकेच्यावतीने विविध उपाय योजना करण्यात येत आहे. कोरानाचा प्रसार रोखण्यासाठी नागरिकांनी महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सुधाकर देशमुख यांनी केले आहे.

## अवैध विदेशी मद्यसाठ्यासह एर्टीगा गाडी जप्त

(मु.शिर्डी, जि.अहमदनगर), साईनाथ श्रीमंत पटाले (रा.शिर्डी, जि.अहमदनगर) या तिघांना अटक करण्यात आली. सदरची कारवाई राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई सुनील चव्हाण, विभागीय उपायुक्त कोकण विभाग ठाणे, किर्ती शेडगे अधिक्षक रायगड अलिबाग, विश्वजीत देशमुख उपाध्यक्ष, यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक भरारी पथक ठाणे आनंदा कांबळे, निरीक्षक एस.एस.गोगावले, निरीक्षक अविनाश रणपिसे, दुय्यम निरीक्षक एस.एस.गायकवाड, दुय्यम निरीक्षक के.सी.मानकर तसेच जवान संदीप पाटील, डी.डी.पोटे, एस.ए.मोरे, विभागीय भरारी पथक ठाणे यांचा स्टाफ जवान अजगावकर, अविनाश जाधव, दिपक घावटे, गीते, सदानंद जाधव, मनोज भोईर, अनंत जगदाडे यांनी केली. सदर गुन्ह्याचा तपास राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड किर्ती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक शिवाजी गायकवाड करीत आहेत.

## रोजगार बंद झाल्याने व्यापारी वर्ग अडचणीत

व्यापा-यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. आठ महिन्याचे आर्थिक नुकसान भरुन काढण्यासाठी पतपेढ्या, मोठे जमीनदार व बँकांमधून कर्ज काढून पुन्हा आपल्या व्यापाराची पुर्णबांधणी केली होती. तर आता शासनाच्या मिनीलॉकडाऊच्या निर्णय लादल्याने याचा फटका पुन्हा एकदा मोलमजुरी, कंत्राटी कामगार, रोजंदारीवर काम करणारे कामगार, छोटे मोठे व्यापारी यांना बसणार आहे.

शासनाने लॉकडाऊन बरोबर बेकार होणा-या कामगारांचाही विचार करणे गरजेचे आहे असे मत कामगारांमधून व्यक्त होत आहे. एकतर लोकडाऊनमध्ये भरमसाठ आलेली वीजबिले माफ केली नाहीत, घरी बसून घरभाडे द्यावे लागले, जीवनावश्यक वस्तू खरेदी कराव्या लागल्या.

आता ते शक्य होणार नसून याची दखल शासनाने घ्यावी. नाहीतर अश्या लोकांना आर्थिक पॅकेज द्यावे असे मत व्यक्त होत आहे. कडक निर्बंध शनिवार रविवार ठिक आहे. पण महिनाभर असे निर्बंध लादल्यास जगावे की, मरावे असा आक्रोश नागरिकांमधून व्यक्त होताना दिसत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# क्षयरुग्णांना सर्व प्रकारच्या शासकीय योजनेत सहभागी करून घ्यावे : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली क्षयरोग निर्मूलन जनजागृती कार्यशाळा व बैठक नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात पार पडली.

यावेळी जिल्हाधिकारी निधी चौधरी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, क्षयरुग्णांना सर्व प्रकारच्या शासकीय योजनेत सहभागी करून घ्यावे. त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. क्षयरुग्णांमध्ये व समाजात जनजागृती करण्याकरिता सर्व आरोग्य संस्थांनी एकत्र येऊन काम करावे. तसेच क्षयरुग्णांना संजय गांधी योजनाच्या लाभ देण्यासाठी तहसिलदार व गटविकास अधिकारी यांनी एकत्र निर्णय घेवून ठोस कृती आराखडा करुन तो यशस्वीपणे राबवावा.




या बैठकीस जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सुरेश ठोकळ, पनवेल महानगरपालिका शहर क्षयरोग अधिकारी डॉ.पद्मिनी येलवे, जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ.सायली तिवारी, जे.एस.डब्लू. प्रतिनिधी रसिक काळे, पत्रकार प्रमोद जाधव, श्री.दिलीप कडवाईकर, जिल्हा नोडल अधिकारी (डापकू) संजय माने, नॅशनल प्रोग्राम प्रिव्हेंटेशन ॲण्ड कंट्रोल ऑफ कॅन्सर डायबेटीस,स्ट्रोक च्या तज्ञ डॉ.रितीमा गुप्ता (NPCDCS), राष्ट्रीय तंबाखू निवारण कार्यक्रमाचे (NTCP) मानस शास्त्रज्ञ तथा समुपदेशक हितेश जाधव, जिल्हा आरोग्य पर्यवेक्षक उदय चव्हाण, माता बाल संगोपन अधिकारी डॉ.चंद्रकांत जगताप, सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी श्री.ज्ञानोबा वाकोडे, जिल्हा पी.पी.एम.समन्वयक सतिश दंतराव, वरिष्ठ क्षयरोग पर्यवेक्षक श्री. कीर्ती पाटील, वरिष्ठ प्रयोगशाळा पर्यवेक्षक विशाल माळी (STLS) आदी उपस्थित होते. बैठकीच्या सुरुवातीस जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सुरेश ठोकळ यांनी सर्व उपस्थितांचे पुष्प–गुच्छ देऊन स्वागत केले. या बैठकीत क्षयरोगसंबंधीच्या सर्व प्रकारच्या योजनांबाबत चर्चा झाली.

# सीकेटी महाविद्यालयातर्फे ऑनलाइन व्याख्यान; लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स ॲाण्ड सायन्स महाविद्यालयातील (ऑटोनॉमस) नवीन पनवेल माजी विद्यार्थी संघाच्या वतीने संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७०व्या वाढदिवसानिमित्त ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

इन्स्पायरेन्ट सिरिज या विषयाच्या व्याख्यानाची सुरुवात विज्ञानशाखेने केली. या व्याख्यानासाठी डॉ. प्रसन्न बाळचंद्र रानडे (विवेकानंद एज्युकेशन सोसायटीज कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज चेंबुर, मुंबई) यांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. बर्हावटे यांनी केले. या इन्स्पायरेन्ट सिरिजचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे त्यांनी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थी संघाचे चेअरमन डॉ. आर. व्ही. येवले यांनी आपल्या महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाच्या स्थापनेविषयी माहिती दिली व कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. या व्याख्यानाचा आयोजित उपदेश असा आहे की, प्रोमिनेन्ट ॲजलुमनी यांना निमंत्रित करून शिक्षण सुरू असलेल्या विद्यार्थ्यांना एक ‘रोल मॉडेल म्हणुन माजी विद्यार्थी आदर्श राहतील.



विज्ञान शाखेतून डॉ. प्रसन्न बाळचंद्र रानडे यांनी करिअर घडविण्यासाठी वेळेचे महत्त्व आणि नियोजन कसे करावे यावरती मार्गदर्शन केले. विज्ञान शाखेतून ३२७ विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग घेतला. आर्टस् शाखेतून प्रियेश राघवन (पिल्लेज एच.ओ.सी. कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, रसायनी) यांनी रोल्स ऑफ कम्युनिकेशन गेटींग जॉब ॲण्ड इम्पॉर्टन्स ऑफ बॉडी लॅन्ग्वेज व्हाईल अपिअरींग फॉर द इंन्टरव्ह्युव या विषयावर मार्गदर्शन केले. कला शाखेतून १३० विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग घेतला. वाणिज्य शाखेतून सी. ए. कुंदन वसंत आंग्रे (मॅनेजर ऑडिट, डीटीएस ॲनन्ड असोसियेट एलएलपी, मुंबई ) यांनी जर्नी टु बिकेम चार्टर्ड अकाऊंट ॲईण्ड अपॉरच्युनटीस इन अकाऊंटन्सी या विषयावर मार्गदर्शन केले.

वाणिज्य शाखेतून ३७३ विद्यार्थ्यांनी या व्याख्यानासाठी सहभाग घेतला. या कार्यक्रमात उपस्थितांचे आभार डॉ. आर. व्ही. येवले यांनी मानले. आपल्या महाविद्यालयातील ॲ लुमनी टिचर्स आरती परदेशी, अर्चना गंधारकर, ज्योत्स्ना पारगावकर, दिगंबर पाटील, अन्वेश वेमुला, राहुल पाटील, हरिभाऊ खरात, वर्षा जगदाळे, भावेश भोईर या सर्वांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मदत केली. तसेच प्राचार्य डॉ. व्ही. डी. बर्हा टे आणि उपप्राचार्य डॉ.एस. के. पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# श्री दत्त मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी अंकुश परदेशी मित्र मंडळाकडून आर्थिक मदतीचा धनादेश



**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

चिरनेर गावातील कातळपाडा ग्रामस्थांचे ग्रामदैवत तसेच भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी अकुंश परदेशी मित्र मंडळाकडून सर्वात प्रथम ५५,५५५ रुपयांचा धनादेश श्री दत्त मंदिर जिर्णोध्दार कमेटी कातळपाडाकडे नुकताच सुपुर्द करण्यात आला आहे.

चिरनेर हे रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक प्रसिध्द, निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले प्रसिध्द गाव आहे. या गावातील निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी, तसेच भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री महागणपतीच्या दर्शनासाठी मुंबई, नवीमुंबई, ठाणे, पनवेल, उरण शहरातून हजारो भाविक, पर्यटक ये–जा करत असतात. यावेळी येणारे भाविक पर्यटक हे १९३० सालच्या चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांच्या आठवणीना उजाळा देत, कातळपाडा ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या, भाविकांच्या हाकेला धावून येणाऱ्या श्री दत्तात्रेयच्या दर्शनासाठी आवर्जून मंदिरात आपल्या कुटुंबासह ये–जा करतात.

अशा श्री दत्त मंदिराचे जिर्णोध्दाराचे काम हे कातळपाडा ग्रामस्थांनी एकदिलाने हाती घेतले आहे. सदर मंदिराच्या जिर्णोध्दाराचे काम हे अंत्यंत सुरेख, सुंदर असावे यासाठी कातळपाडा येथील केणी, परदेशी, भगत, म्हात्रे, गोंधळी, वशेणीकर, बैकर, नारंगीकर कुटुंबानी पुढाकार घेऊन सरळ हस्ते मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा एक भाग म्हणून प्रथम अंकुश परदेशी मित्र मंडळाच्या माध्यमातून श्री दत्त मंदिर जिर्णोध्दार कमेटी कातळपाडाकडे ५५,५५५ रुपयांचा धनादेश सुपुर्द करण्यात आला आहे. यावेळी अलंकार परदेशी, चंद्रकांत गोंधळी, जे.एम.म्हात्रे, रमेश गोंधळी, नामदेव भगत, अविनाश परदेशी, नारायण गोंधळी सह इतर मान्यवर उपस्थित होते.

# १२ एप्रिल रोजी होणारा कोकण विभागीय लोकशाही दिन रद्द

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सद्या राज्यात कोविड–१९ या साथीच्या रोगाचा प्रसार झपाट्याने होत असल्याने कोविड–१९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडील दि.४ एप्रिल २०२१ रोजीच्या आदेशान्वये राज्यात दि.५ एप्रिल २०२१ पासून कडक निर्बंध लावण्यात आलेले आहेत.

लोकशाही दिनाच्या बैठकीस मोठया संख्येने अर्जदार व विविध कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्ग कार्यालयात उपस्थित असतात. अशा वेळी कोविड–१९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने शासनाने दि.४ एप्रिल २०२१ रोजीच्या आदेशान्वये निर्गमित केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येऊन सोमवार दि.१२ एप्रिल २०२१ रोजी आयोजित केलेला लोकशाही दिन रद्द करण्यात येत आहे. असे उपायुक्त (सामान्य प्रशासन), कोकण विभाग, नवी मुंबई यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

# नागोठण्यात गळफास घेऊन एकाची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील वरवठणे गावाच्या हद्दितील अंबा नदी किनारी असलेल्या झाडाला एका ३५ वर्षीय आदिवासी तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना बुधवार दि. ७ एप्रिल रोजी दुपारी दिड वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

आदिवासी असलेल्या तरुणाची अद्याप ओळख पटली नसून या घटनेची नागोठणे पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.

# मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्यासाठी गृहिणींची लगबग

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कोरोनाचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढू लागला आहे.अशा परिस्थितीत सर्वत्र विस्कळीतपणा येऊन जनजिवनावरही त्याचा परिणाम जाणवू लागला आहे. कोरोनामुळे सर्वच बाबतीत आर्थिक कुचंबना झाली असतानाच गृहीणी मात्र पैशांची तजवीज करून वर्षभर लागणारे मसाल्याचे पदार्थ खरेदी करीत असतानाची त्यांची लगबग दिसून येत आहे.

बाजारात मिळणारे विविध कंपन्यांचे तयार मसाले परवडत नसल्याने मिरची खरेदी करून त्याचा मसाला बनविण्यावर गृहीणींचा कल दिसून येतो. त्यामुळे शंकेश्वरी, बेडगी, कश्मिरी, गंटूर, लवंगी, कोल्हापूरी मिरची आदी मिरची खरेदी करणे, त्याचबरोबर धडे, बडीशोप, अख्खा मसाला, जिरे, मोहरी, हळकुंड आदी मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्यासाठी गृहीणींची एकच लगबग सुरू झाली असल्याचे दिसून येत आहे. रोहे शहरातील मिरची गल्लीत सध्या मिरची खरेदी करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला येत असताना दिसत आहेत. तर कोरोना महामारी, अधूनमधून कोसळणारा अवकळी पाऊस, मिरचीचे उत्पादनात होणारी घट आदींमुळे गतवर्षापेक्षा यावर्षी मसाल्याचे विविध पदार्थांसह मिरचीचेही भाव वाढले असल्याचे दिसून येत असले तरी दैनंदिन जीवनात मसाल्याचे पदार्थ व मसाले यांची मोठीच आवश्यकता असल्याने किंमती कितीही जरी वाढल्या तरी मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्याचा गृहीणींचा उत्साह मात्र कायम आहे.

# प्रभाग समिती सभापती सुशीला घरत यांच्याकडून आणखी एक विकासकाम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग ’ड’ समिती सभापती सुशिला जगदिश घरत यांच्या माध्यमातून नवीन पनवेल मधील सेक्टर १४ येथील ओम अपार्टमेंट ओनर्स असोसिशन ई –१ मधील बिल्डिंग क्रमांक ११, १२ व १३ मध्ये पिण्याच्या पाण्याची नवीन पाईपलाईन बसविण्याच्या कामाचे शुभारंभ करण्यात आले.

कोरोना नियमांचे पालन करून झालेल्या या कार्यक्रमास प्रभाग ’ड’ समिती सभापती सुशिला जगदिश घरत, सोसायटी चेअरमन विश्वास पाटील, सचिव श्री निंबाळकर, खजिनदार शिवाजी लाम, अनंता कोळी, भाई गरुडे, अमोल पाटील, संजय बोले, पंढरीनाथ म्हात्रे, लक्ष्मी छाथम आदी उपस्थित होते. लोकप्रतिनिधी म्हणून सुशिला घरत यांच्या मार्फत नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे सातत्याने प्रयत्न होत असतात त्याचबरोबर अनेक विकासकामे सुरूच असतात, त्याच अनुषंगाने आणखी एका विकासकामाला येथे सुरुवात झाली आहे, त्यामुळे येथील नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर, प्रभाग समिती सभापती सुशील घरत यांचे आभार व्यक्त केले जात आहे.

---

मा.श्री.बहिर साहेब

ॲड.संजय के. कानडे
ॲड.अनिल आर नागदेवे
ॲड.गौरव संजय कानडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३३३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.३०/०४/२०२१

कै.यमुना बळीराम घोडेकर (मयत) यांचे वारस
१) श्री.शशिकांत बळीराम घोडेकर
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पोदी नं.२, सेक्टर १६, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.सुर्यकांत बळीराम घोडेकर
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पोदी नं.२, सेक्टर १६, नवीन पनवेल
ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.प्रमोद बळीराम घोडेकर
वय : ४६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.पोदी नं.२, सेक्टर १६, नवीन पनवेल
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.यमुना बळीराम घोडेकर यांचे दि.२९/०७/२०१३ रोजी पोदी नं.२, से.१६, नवीन पनवेल येथे निधन झालेले असून त्यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत. कै.यमुना बळीराम घोडेकर यांच्या वडिलाची म्हणजेच कै.हरिभाऊ रामचंद्र परंडवाल यांच्या सामाईक मालकी वहिवाटीची खालीलप्रमाणे वर्णन असलेली मिळकत महाराष्ट्र शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता दि.०३/०२/१९७० चे नोटीफिकेशनने युनिट केस नं.३५१०, ११ सी, ४२६ प्रमाणे भूसंपादीत झालेली आहे.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पनवेल | ३५१० | २७८ | १ | ०–८०–२ | १७.५६ |
| | | २८२ | २ | ०–८०–५ | १२.७१ |
| | | २८४ | १ | ०–७४–२ | ७.०० |
| पनवेल | ११ सी | २७३ | पार्ट | ०–३०–०० | ४.८० |
| | ४२६ | २७१ | १ | १–७–७ | २२.०६ |
| | | २८५ | १+२ / २ | ०–०५–१२ | १.०० |
| | | २८६ | २ | ०–८१–९ | ७.८७ |

अर्जदार यांना कै.यमुना बळीराम घोडेकर यांचे वारस म्हणून १२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत वर नमूद संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात सिडकोकडून मिळणाऱ्या भूखंडामध्ये व इतर मोबदल्यामध्ये मिळकतीमध्ये वडिलांच्या १/३ हिश्यामध्ये १/५ (पाचवा) हिस्सा आहे. सबब वरील मिळकतीसाठी वारसदाखला मिळावा म्हणून अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

तरी अर्जदार यांच्या वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार हे कै.यमुना बळीराम घोडेकर यांच्या वारस पत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसदाखला मंजूर करेल.

आज दि.७/४/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/–
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

---

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे
ॲड.नरेश चांगा पाटील

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.८१/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०६/२०२१

१) सौ.अरुणा ज्ञानेश्वर भगत
पुर्वाश्रमीची अरुणा प्रभाकर पाटील
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.रुम नं.३४९, कोरबा मिठानगर, महात्मा फुले वाडी,
वडाळा ईस्ट, व्हिटीसी मुंबई अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असलेमुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येत आहे की, सदरचा अर्ज हा वारसदाखला मिळणेकरिता वरील अर्जदार दाखल करीत आहेत. अर्जदार यांची आई स्व.कुसुम प्रभाकर पाटील हे जसखार, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे दि.१०/०२/२०१३ रोजी मृत्यू पावले आहेत. स्व.कुसुम प्रभाकर पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील वारसांची नोंद होणेकरिता सदरचा चौकशी अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

स्व.हरिश्चंद्र उर्फ हरी बाळकृष्ण तांडेल हे दि.१०/११/१९९१ रोजी मयत झाले असून त्यांना अनु क्र. १) विनायक, २) हिरामण, ३) प्रकाश, ४) प्रमा, ५) स्व.कुसुम, ६) स्व.सुमन, ७) चंद्रकांत अशी एकूण ७ मुले आहेत. ह्यातून स्व.कुसुम प्रभाकर पाटील मयत झाले आहेत. यांच्या सामाईक मालकीच्या व ताबेकब्जेतील खालील वर्णनाच्या मिळकती मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे होत्या.

भूसंपादीत झालेल्या सर्व सामाईक जमीन मिळकती संबंधी वरील मयतांच्या वारसदारांनी आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेकरिता उच्च न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक २१९/२००८ अन्वये दाखल करण्यात आला होता. सदर चौकशी अर्ज दि.२४/०३/२००९ रोजी मंजूर करण्यात आला होता. चौकशी अर्ज नं.२१९/२००८ मधील एक वारस स्व.कुसुम प्रभाकर पाटील हे दि.१०/०२/२०१३ रोजी मयत झाले असून त्यांचा भूसंपादीत मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व हिस्सा आहे.

अर्जदार हे वर उल्लेख केलेल्या वंशावळीप्रमाणे मयत स्व.कुसुम प्रभाकर पाटील हे हिंदू वारस कायद्यान्वये वारस आहेत. त्यांचे वारसा हक्क असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती शासनातर्फे सिडको करिता भूसंपादीत झालेल्या आहेत. सदर जमीन मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे :–

**मौजे : जसखार, तालुका : उरण, जिल्हा : रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|
| १ | २५ | २ | ०–१२–७ | २३९ |
| २ | २८ | ६ | ०–०२–३ | |
| ३ | ३८ | १३ | ०–०६–८ | |
| ४ | ४३ | ९ | ०–०३–८ | |
| ५ | ७८ | ४ | ०–०८–० | |
| ६ | ९२ | ४ | ०–०४–० | |
| ७ | ७३ | ६ | ०–०८–९ | |
| ८ | ९४ | १३ | ०–०६–० | |
| ९ | ११३ | ५ | ०–०३–८ | |
| १० | १६९ | १३ | ०–१२–६ | |
| ११ | १७० | ११ | ०–१२–७ | |
| १२ | १४५ | ७ | ०–०५–० | |
| १३ | १८८ | ३ | ०–१५–० | |

सदर मिळकतीबाबत शासकीय योजनेप्रमाणे साडेबारा टक्के भूखंड मिळणार आहेत. स्व.कुसुम प्रभाकर पाटील यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांची नोंद होणेकरिता आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेसाठी सदरचा चौकशी अर्ज नं.८१/२०२१ नामदार कोर्टात दाखल केला आहे.

तरी वर उल्लेख केलेले मिळकती संबंधी इतर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रकाशित झालेपासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या कोर्टात हजर रहावे.

जर कोणी वर उल्लेख केलेप्रमाणे हजर राहून हरकत न घेतलेस सदर न्यायालय वरील अर्जांचे संदर्भात योग्य तो हुकूम करील.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी आज दि.०७/०४/२०२१ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि. व फौ.न्याया, उरण

---

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे
ॲड.नरेश चांगा पाटील

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०६/२०२१

१) श्री.दिपक हसुराम घरत
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : धंदा
रा.धाकटीजुई, हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
२) सौ.भारती हिराचंद मोकल
पुर्वाश्रमीची भारती हसुराम घरत
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.चिरनेर, मधीलपाडा, ता.उरण, जि.रायगड
३) सौ.मनिषा संजय भोईर
पुर्वाश्रमीची मनिषा हसुराम घरत
वय : ३० वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, ता.उरण, जि.रायगड
४) दिपाली हसुराम घरत
वय : वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.धाकटी जुई, हरिश्चंद्र पिंपळे, दिघोडे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असलेमुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येत आहे की, सदरचा अर्ज हा वारसदाखला मिळणेकरिता वरील अर्जदार दाखल करीत आहेत. अर्जदार नं.१ ते ४ यांची आई स्व.सुमन हसुराम घरत हे धाकटी जुई, तालुका : उरण, जिल्हा : रायगड येथे दि.०६/०९/२०२० रोजी मृत्यू पावले आहेत. स्व.सुमन हसुराम घरत यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील वारसांची नोंद होणेकरिता सदरचा चौकशी अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

स्व.हरिश्चंद्र उर्फ हरी बाळकृष्ण तांडेल हे दि.१०/११/१९९१ रोजी मयत झाले असून त्यांना अनु क्र. १) विनायक, २) हिरामण, ३) प्रकाश, ४) प्रमा, ५) स्व.कुसुम, ६) स्व.सुमन, ७) चंद्रकांत अशी एकूण ७ मुले आहेत. ह्यातून स्व.सुमन हसुराम घरत मयत झाले आहेत. यांच्या सामाईक मालकीच्या व ताबेकब्जेतील खालील वर्णनाच्या मिळकती मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे होत्या.

भूसंपादीत झालेल्या सर्व सामाईक जमीन मिळकती संबंधी वरील मयतांच्या वारसदारांनी आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेकरिता उच्च न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रमांक २१९/२००८ अन्वये दाखल करण्यात आला होता. सदर चौकशी अर्ज दि.२४/०३/२००९ रोजी मंजूर करण्यात आला होता. चौकशी अर्ज नं.२१९/२००८ मधील एक वारस स्व.सुमन हसुराम घरत हे दि.०६/०९/२०२० रोजी मयत झाले असून त्यांचा भूसंपादीत मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व हिस्सा आहे.

अर्जदार हे वर उल्लेख केलेल्या वंशावळीप्रमाणे मयत स्व.सुमन हसुराम घरत हे हिंदू वारस कायद्यान्वये वारस आहेत. त्यांचे वारसा हक्क असलेल्या खालील वर्णनाच्या जमीन मिळकती शासनातर्फे सिडको करिता भूसंपादीत झालेल्या आहेत. सदर जमीन मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे :–

**मौजे : जसखार, तालुका : उरण, जिल्हा : रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस नं. |
|---|---|---|---|---|
| १ | २५ | २ | ०–१२–७ | २३९ |
| २ | २८ | ६ | ०–०२–३ | |
| ३ | ३८ | १३ | ०–०६–८ | |
| ४ | ४३ | ९ | ०–०३–८ | |
| ५ | ७८ | ४ | ०–०८–० | |
| ६ | ९२ | ४ | ०–०४–० | |
| ७ | ७३ | ६ | ०–०८–९ | |
| ८ | ९४ | १३ | ०–०६–० | |
| ९ | ११३ | ५ | ०–०३–८ | |
| १० | १६९ | १३ | ०–१२–६ | |
| ११ | १७० | ११ | ०–१२–७ | |
| १२ | १४५ | ७ | ०–०५–० | |
| १३ | १८८ | ३ | ०–१५–० | |

सदर मिळकतीबाबत शासकीय योजनेप्रमाणे साडेबारा टक्के भूखंड मिळणार आहेत. स्व.सुमन हसुराम घरत यांचे कायदेशीर वारस म्हणून वरील अर्जदारांची नोंद होणेकरिता आवश्यक असलेला वारस दाखला मिळणेसाठी सदरचा चौकशी अर्ज नं.७७/२०२१ नामदार कोर्टात दाखल केला आहे.

तरी वर उल्लेख केलेले मिळकती संबंधी इतर कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी स्वतः किंवा त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रकाशित झालेपासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या कोर्टात हजर रहावे.

जर कोणी वर उल्लेख केलेप्रमाणे हजर राहून हरकत न घेतलेस सदर न्यायालय वरील अर्जांचे संदर्भात योग्य तो हुकूम करील.

माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी आज दि.०७/०४/२०२१ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा.अधिक्षक
दि. व फौ.न्याया, उरण

## संक्षिप्त...

### रिक्षा चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरासमोर उभ्या करून ठेवलेल्या रिक्षाची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

गुंजाळ कुटुंबियांची ४५ हजार रुपये किंमतीची रिक्षा आझाद नगर झोपडपट्टी येथे राहत्या घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने सदर रिक्षा चोरुन नेली आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### खारघरमधून पोलिसाचीच गाडी चोरीला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर मध्ये वास्तव्यास असलेले पोलीस उपनिरीक्षकांचीच दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे.

खारघर सेक्टर ३ मध्ये अनमोल दर्शन सोसायटीत राहणारे पोलीस उपनिरीक्षकांनी आपल्या घरसमोर दुचाकी एमएच.४५ , एक्स . ८६९० हि दुचाकी पार्क केली होती. चोरटयांनी हि गाडी घराखालुन चोरली आहे. खारघर मध्ये नजीकच्या काळात मोठ्या प्रमाणात वाहने चोरीच्या घटना घडत आहेत. मात्र या घटनेत खुद्द पोलिसांचीच गाडी चोरीला गेल्याने शहरातील वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.दुचाकीचे मालक हे नवी मुंबई मधील तुर्भे पोलीस ठाण्यात उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. चोरी गेलेल्या दुचाकीची फिर्याद त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. त्यादृष्टीने खारघर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.चोरीच्या घटना याठिकाणी लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात देखील कैद झाली आहे.

### सुधागड: पेडलीमध्ये उलगडला शिव इतिहास

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शिवकालीन विविध प्रकारची शस्त्र ग्रामीण भागात दृष्टीक्षेपात पडणे म्हणजे एक पर्वणीच. सुधागड तालुक्यातील पेडली गावात शिवकालीन शस्त्रांचे प्रदर्शन नुकतेच भरविण्यात आले होते. पेडली येथील सॅम मित्रमंडळाच्या वतीने हे शस्त्रांचे प्रदर्शन भरविले होते.

या प्रदर्शनात तलवार, कट्ट्यार, बिचवा, भाला, ढाल, दांडपट्टा आदी शिवकालीन विविध प्रकारची शस्त्रे ठेवली होती. आणि त्यांची संपूर्ण माहिती देखील देण्यात आली होती. तालुक्यासह इतरही ठिकाणच्या नागरिकांनी या शस्त्रांच्या प्रदर्शनास भेट देऊन शिवकालीन इतिहासाची माहिती घेतली. यावेळी शिवचरित्र व्याख्यान, रक्तदान शिबिर व कोरोना योद्ध्यांचा सन्मान देखील करण्यात आला. पेडली विभागातील सर्व शिवप्रेमींनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.

# माथेरानकर अनियमित पाणी पुरवठ्याने हैराण

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान मध्ये केला जाणारा पाणी पुरवठा रोजच खंडित होत असल्याने येथील स्थानिकांना गैरसोयीस सामोरे जावे लागत असून रोजच पाणी सोडण्याची वेळ बदलत असल्याने प्रामुख्याने घर सांभाळून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्याचा त्रास सोसावा लागत आहे.

माथेरानकरांच्या मागील पाण्याचे शुक्लकाष्ठ सुटण्याचे नाव घेत नसून पालिकेकडून वारंवार सूचना देऊन ही माथेरांकरांना रोजचा सुरळीत पाणी पुरवठा होत नसून अनेकवेळा गडुळ पाणी पुरवठा होत आहे त्याविरोधात सोशल मीडिया वर तीव्र प्रतिक्रिया उठताना दिसत आहेत. माथेरान करिता येथील शारलेट लेक व नेरळ येथून उल्हास नदीचे पाणी जलवाहिनीयांद्वारे घेऊन पाणी पुरवठा केला जात आहे येथील शारलेट लेक ची पाणी साठवणी मर्यादित आहे त्यामुळे माथेरान करांना नेरळ येथून होणाऱ्या पाणी पुरावठ्यावरच अवलंबून राहावे लागत आहे येथून खेचले जाणारे पाणी नेरळ माथेरान घाटातील जुमापट्टी, वॉटर पाईप ह्या पंप स्टेशन द्वारे माथेरान मधील जलशुद्धीकरण केंद्रात पोहचविले जाते ,घाटातील दोन पंपिंग स्टेशन ह्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहेत येथून पाणीपुरावठा सुरळीत झाला तर माथेरांकरांना रोज पाणी मिळते पण येथेच नेहमी काही ना काही गडबड होत असून माथेरानचे पर्यटन लक्षात घेता माथेरान ला रोज बारा तासाहून अधिक वेळ पंपिंग झालीच पाहिजे पण प्रत्यक्षात सरासरी सात ते आठ तासच पंपिंग होत असल्याने माथेरान मधील काही भागात कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे तर घाटातील पंपिंग बिघडल्यास काही भागांना पाणी पुरवठा च होत नसल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत नेरळ मधील पाणी बंद झाल्यास माथेरानमधील शारलेट लेकचे पाणी वापरले जात आहे व वारंवार हे पाणी वापरले गेल्याने लेकच्या पाण्याची पातळी खूपच खाली गेली असून मे महिन्याच्या पर्यटन हंगामामध्ये माथेरान करांना पाणी टंचाईस तर सामोरे जावे लागणार नाही ना अशी भीती सर्वत्र व्यक्त केली जात आहे माथेरान च्या शारलेट लेक येथील पाणी शहरास वाटप होत असताना त्याचे पुरेसे शुद्धीकरण होत नसल्याचे आढळून येत



आहे येथील जलशुद्धीकरण केंद्र हे ब्रिटिश कालीन असून त्याची क्षमतेच्या दुप्पट पाणी सध्या माथेरान करांना लागत आहे त्यामुळे पुरेसे शुद्ध पाणी माथेरांकरांना उपलब्द होत नाही तसेच ४६ कोटी रुपये माथेरांकरिता नवीन पाणी योजना व जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी वापरण्यात आले पण ह्या जलशुद्धीकरण केंद्राचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून उदघाटनपूर्वीच येथे बनविण्यात आलेल्या टाक्या लिकेज झाल्या आहेत ह्या ठिकाणी ठेकेदाराने घाईगडबडीत काम उरकले असून सदर ठेकेदारच पळून गेल्याचे निदर्शनास येत आहे, कामच पूर्ण नसल्याने ह्या वास्तूच्या उदघाटनास मुहूर्तच सापडलेला नाही कोणीही अधिकारी ही इमारत ताब्यात घेऊन हे जलशुद्धीकरण केंद्र सुरू करण्याच्या मनस्थितीत दिसत नाही माथेरानमधील स्थानिकांनी अनेकवेळा ह्या ठेकेदारावर कारवाई व्हावी अशी मागणी करून ही त्यास अधिकाऱ्यांकडून प्रतिसाद लाभलेला नाही.

माथेरान पर्यटन नगरीस येथील शार्लोट लेक येथून पाणी पुरवठा होत असतो पण मागील काही वर्षांमध्ये येथे झपाट्याने पर्यटकांची संख्या वाढू लागल्याने हे पाणी कमी पडू लागले होते त्याकरिता नेरळ येथील उल्हासनदीचे पाणी पंपांद्वारे माथेरानपर्यंत नेहून पाणी टंचाईवर मात करण्यात आली पण हे पाणी नेताना माथेरानयेथील शार्लोट लेक येथील पंपिंग स्टेशन कडे प्राधिकरणाने दुर्लक्ष केले पूर्वी येथे विज नसलीतरी जनरेटरच्या सहाय्याने पाणी पंपिंग करून सर्वत्र वितरित केले जात होते पण नेरळहून येणारे पाणी येथील जलशुद्धीकरण केंद्रात येऊ लागल्याने शार्लोट लेक येथील कार्यालय बंद पडू लागले त्याच्यामुळे येथे असलेली यंत्रसामुग्री व जनरेटरच्या देखरेखीकडे दुर्लक्ष झाल्याने येथील एकएक सुविधा बंद होऊ लागल्या ज्याचे विपरीत परिणाम आता माथेरानकरांना भोगावे लागत आहेत नेरळ येथील पाणी पुरवठा खंडित झाल्यास व शार्लोट लेक येथील वीज अनियमित झाल्यास माथेरान करांना पिण्याच्या पाण्यास मुकावे लागते येथील लाखो रुपयांचे जनरेटर वापराविना गंजले आहेत जिल्ह्यात सर्वात जास्त पाणी बिल माथेरानमध्येच आकारले जाते तरीही अनेकवेळा वीज नसली कि येथील पाणी पुरवठा खंडित होत असतो असे वर्षातून दोन तीन वेळा होत असते त्यावर कायम स्वरूपी तोडगा काढण्यास जल प्राधिकरण अपयशी ठरले आहे.

माथेरानमध्ये व्यावसायिक व घरगुती अशी जवळपास तेराशे नळजोडण्या आहेत त्याचे मासिक उत्पन्न सरासरी वीस लाखाच्या आसपास होते म्हणजे जोडण्याच्या हिशोबाने येथे उत्पन्न जास्त आहे कर्मचाऱ्यांच्या वेतन पाच सहा लाख पकडले तरी जलप्राधिकरणाकडे मोठी रक्कम उरत आहे पण नेरळ ते माथेरान ह्या दरम्यान असलेली मोठी पंपिंग स्टेशन व त्याला लागणारी वीज ह्याच्या देयकांची रक्कम बारा लाखाच्या आसपास आहे व ह्यामुळेच हि पाणी योजना माथेरान करांना महाग ठरत आहे जल प्राधिकरण हि विजेची बिले माथेरानकरांकडून जाडा भाडे लावून वसूल करीत आहे व ह्याच पंपिंग स्टेशनवरून अनेक पाणी जोडण्यादेण्यात आल्या आहेत त्यांना मात्र त्यात सूट मिळत आहे तसेच शासनाकडून वीज बिल मध्ये सवलत मिळण्यासाठी प्रयत्न न करता माथेरानकरांना वेठीस धरले जात आहे इतके करूनही माथेरानकरांना मात्र दिलासा नाहीच पाणी बिले भरण्यास विलंब झाल्यास पाणी जोडणी कापल्या जातात.

माथेरानच्या नगराध्यक्ष प्रेरणा सावंत यांनी आपल्या दालनामध्ये जलप्राधिकारणाच्या सर्व अधिकाऱ्यांना बोलावून माथेरानला होणारा पाणीपुरवठा अखंडित व्हावा ह्या करिता तंबी देऊन ही मागील काही दिवसांमध्ये माथेरांकरांना दूषित पाणीपुरवठा केला गेला त्यामुळे हे अधिकारी माथेरानच्या पाणीपुरवठ्याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचेच दिसून येत आहे.

## सुधागड तालुक्यात कोरोनाचा कहर, नव्या ४ कोरोना बाधित रुग्णांची भर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यात कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत आहे. मंगळवारी (ता.६) सायंकाळी उशिरा प्राप्त अहवालानुसार कोरोनाचे ४ रुग्ण सापडले आहेत. सध्या तालुक्यात कोरोनाचे ४७ सक्रिय रुग्ण असून यातील ४६ रुग्ण गृहविलगीकरणमध्ये तर १ रुग्ण जिल्हा रुग्णालय अलिबाग येथे उपचार घेत आहे. अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली.

तालुक्यात आत्तापर्यंत कोरोनाचे ५२९ रुग्ण झाले असून ४५६ रुग्ण बरे झाले आहेत. आणि २६ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. अशी माहिती देखील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. शशिकांत मढवी यांनी दिली आहे. नागरिकांनी शासन नियमांचे पालन करून योग्य खबरदारी व काळजी घ्यावी आणि घाबरून जाऊ नये असे आवाहन देखील डॉ. शशिकांत मढवी यांनी केले आहे.

## मौजे हरिग्राममधील शेतकऱ्यांचा पनवेल पंचायत समिती समोर उपोषणाचा इशारा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील मौजे हरिग्राम गावातील शेतकऱ्यांना तालुका कृषि अधिकारी शासनाच्या योजनांची कोणतीही माहिती देत नाहीत. आधुनिक पध्दतीने शेती करून कसे जास्त उत्पन्न घ्यावयाचे याची माहिती देत नाहीत. बियाणे व खते वेळे यावर उपलब्ध करून देत नसल्याने व्यापारी शेतकऱ्यांची लूटमार करीत असल्याची तकार मौजे हरिग्राम येथील शेतकऱ्यांनी केली आहे.

पनवेल तालुक्यात मौजे हरिग्राम हे दोन हजार लोक वस्तीचे गाव आहे. येथे आदिवासी ठाकूर, आदिवासी कातकरी व आगरी समाजचे लोक राहतात . या लोकांचे मुख्य उपजीविकेचे साधन शेती आहे. पावसाळ्यात भात व उन्हाळ्यात मळे लावून त्यातील उत्पन्नावर त्यांची उपजीविका चालते ते अशिक्षित व अडाणी असल्याने त्यांना शेती मधून जास्त उत्पन्न घेण्यासाठी आधुनिक पध्दतीने शेती कशी करावी, कोणते उत्पन्न घ्यावे याबाबत तालुका कृषि अधिकारी त्याठिकाणी येऊन कोणतीही माहिती देत नाहीत. त्यामुळे ते पारंपारिक पध्दतीने शेती करतात. शेती साथी बियाणे व खाते वेळेवर उपलब्ध करून दिली जात नसल्याने बाजारातून चढया भावाने खरेदी करावी लागतात. शेतकऱ्यांसाठी शासनाच्या असलेल्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्याचे काम तालुका कृषि अधिकाऱ्यांचे असताना ते कधी ही मौजे हरिग्रामला भेट देऊन शेतकऱ्यांना त्याची माहिती देत नाहीत. एखादा अधिकारी कधी तरी येऊन एखाद्या झाडाचा फोटो काढून घेऊन जातो आणि देखावा करतो. गेल्या वर्षी वादळाचे पंचनामे ही प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी न येता शेतकऱ्यांना सातबारे घेऊन ग्रामपंचायत कार्यालयात बोलावून करण्यात आले. पारधी यांनी कालिंगडाचे विक्रमी पीक घेतले त्याची यांना माहिती ही नाही. त्यामुळे त्याला हमी भाव ही मिळाला नाही. त्यामुळे त्याला नुकसान सोसावे लागले. यावर उपाय योजना न झाल्यास आम्ही पनवेल पंचायत समितीसमोर उपोषणाला बसू असा इशारा पारधी व इतर १२ जणांनी कृषि अधिकाऱ्यां पत्र देऊन दिला आहे.

## नागोठण्यात विना मास्क फिरणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

### १३५ जणांकडून वसूल केला दंड ; नागोठणे ग्रामपंचायत व पोलीसांची संयुक्त कारवाई

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

राज्यात पुन्हा एकदा कोराना विषाणूचा संसर्ग झपाट्याने वाढत असतांनाच अनेक ठिकाणी नागरिक राजरोसपणे सरकारने आखून दिलेल्या नियमांचे उल्लंघन करताना दिसून येत आहेत. याच पार्श्वभूमीवर नागोठणे शहरात शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन न करणाऱ्या १३५ नागरिकांवर नागोठणे ग्रामपंचायत व पोलीसांनी संयुक्त कारवाई करीत दंड वसुली केली आहे.

नागोठण्याचे सरपंच डॉ.मिलिंद धात्रक यांनी नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटूकडे यांच्या सहकार्याने ग्रामपंचायत कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांच्या मार्फत ही संयुक्त कारवाई केली. या संयुक्त कारवाई मध्ये नागोठणे शहरातील मुख्य अशा छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीन ते चार दिवसांत विना मास्क शहरात वावरणाऱ्या जवळ पास १३५ नागरिकांवर दंडात्मक कारवाई करत त्यांच्या कडून दंड वसूल केला.

या कारवाई दरम्यान नागोठणे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दादासाहेब घुटूकडे हे स्वतः छत्रपती शिवाजी महाराज चौकात उपस्थित होते.

दरम्यान कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग रोखण्यासाठी सरकारने कडक निर्बंध लावण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. राज्यात सर्वत्र सोमवारपासून अंशत: लॉकडाऊन लावण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर यांच्या दालनात सोमवार दि.५ रोजी सकाळी संपन्न झालेल्या बैठकीत रायगड जिल्ह्यात सोमवार, ५ एप्रिल रात्री ८ पासून ३० एप्रिलपर्यंत याची अंमलबजावणी केली जाईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जाहीर करण्यात आले. अत्यावश्यक सेवा वगळून इतर सर्व अस्थापना बंद ठेवण्यात येणार आहेत. परंतु निर्बंध सोमवारी रात्रीपासून लागू होणार की फक्त शनिवारी, रविवारी असणार याविषयी व्यवसायीक व नागरिकांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. जिल्ह्यासह राज्यात १४४ कलम लागू करण्यात आला असून सकाळी ७ ते रात्री ८ जमावबंदी म्हणजे ५ पेक्षा जास्त लोकांना एकत्र येण्यास मनाई राहील तसेच रात्री ८ ते सकाळी ७ वाजेपर्यंत कोणत्याही व्यक्तीस योग्य कारणाशिवाय बाहेर पडता येणार नाही. यातून वैद्यकीय व इतर अत्यावश्यक सेवा वगळण्यात येतील. किराणा, औषधी, भाजीपाला आदी जीवनावश्यक व आवश्यक वस्तू सोडून इतर सर्व प्रकारची दुकाने, मॉल्स, बाजारपेठा, ३० एप्रिलपर्यंत बंद राहतील. यामुळे नागोठणे शहरातील अत्यावश्यक सेवा पुरविणारे दुकाने वगळता इतर दुकाने ग्रामपंचायत व पोलीस यांच्या मार्फत बंद करण्यात आली.

तसेच याच दरम्यान शासनाने काढलेल्या पत्रकात नमूद केल्याप्रमाणे अत्यावश्यक वस्तू व सेवांच्या दुकानातील दुकानदार व कर्मचाऱ्यांनी आपले लसीकरण पूर्ण करून घ्यावेत तसेच स्वत: व ग्राहकांकडून नियमांचे पालन होते किंवा नाही ते पाहावे लागणार आहे.

## मोहीम थांबल्याने शिधापत्रिकाधारक संभ्रमात ; दोन महिन्याच्या नुतनीकरणाला एकदम ब्रेक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने दोन महिने सुरु असलेल्या अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेला अचानक स्थगिती करण्याचे आदेश काढल्याने शिधापत्रिकाधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारने एप्रिल बनविल्याचे चर्चा सध्या पनवेल परिसरात फिरत आहे.

१ फेब्रुवारी रोजी सुरु झालेली राज्यभरातील अपात्र शिधापत्रिका शोध मोहीम गावोगावच्या स्वस्त धान्य दुकानाच्या माध्यमातून सुरु होती. फेब्रुवारी ते एप्रिल अखेर तीन महिने या कालावधीमध्ये हि मोहीम सुरु राहणार होती. असे शासनाच्या आदेशामध्ये म्हटले होते. यामोहीमेअंतर्गत स्थलांतरित झालेली आणि स्थलांतर करून आलेली कुटुंबे शोधून शिधापत्रिकांचे नूतनीकरणाचे काम सुरु होते. यासाठी कुटुंब प्रमुखाचे फोटो, रेशन कार्ड, आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, गॅस जोडणी पुस्तक, वीज बिले, फोन बिले, बँक पासबुक, तलाठ्यांच्या उत्पन्नाचा दाखल या बाबींच्या पूर्ततेसाठी कुटुंबाचा प्रत्येकी सुमारे शंभर ते दोनशे रुपये खर्च झाला आहे.

फेब्रुवारी आणि मार्च या दोन महिन्यात ग्रामीण भागातील अशिक्षित, अल्पशिक्षित महिला पुरुषांनी कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी आपली रोजंदारीची कामे दोन-दोन, तीन-तीन दिवस थांबवून या कमी वेळ दिलेला असल्याचे पनवेलमधील एका रोजंदारी कामे करणाऱ्या सुरेंद्र पडसी या नागरिकाने बोलताना संगितले. मात्र सरकारने या आदेशाला अचानक स्थगिती दिल्याने पनवेलमधील शिधापत्रिकाधारक संभ्रमामध्ये आहेत.


या मोहिमेबाबत स्वस्त धान्य दुकान संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांना विचारले असता, त्यांनी सांगितले कि, या मोहिमेला आम्ही फक्त सहकार्य करण्याची भूमिका घेतली होती. तसेच हि मोहीम सुरु झाल्याची माहिती पुरवठा विभागाने आम्हाला दिली होती. मात्र १ एप्रिल रोजी काढलेल्या या स्थगिती शासन आदेशाने दोन महिने सुरु असलेल्या शिधापत्रिका शोध मोहिमेला सामान्य ग्राहकांनी तलाठी कार्यालय, झेरॉक्स सेंटर, याद्वारे कागदपत्राची कागदपत्राच्या पूर्ततेला अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने राज्यासह पनवेलमधील शिधापत्रिका धारकांना एकप्रकारे एप्रिल फुल केले आहे काय , अशी चर्चा पनवेलमधील त्रस्त नागरिकांकडून व्यक्त होत असल्याची माहिती अध्यक्ष भरत पाटील यांनी बोलताना दिली.

# पोलादपूरमध्ये लॉकडाऊनच्या आदेशांचा प्रशासनाकडून विपर्यास

**दै.रायगड नगरी । शैलेश पालकर**

**पोलादपूर** : तालुक्याचे शहर असलेल्या पोलादपूर नगरपंचायत हद्दीमध्ये लॉकडाऊनच्या आदेशांचा विपर्यास प्रशासनाकडून केला गेला असून काय बंद आणि काय सुरू ठेवायचे यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वांबाबत प्रचंड गोंधळाची परिस्थिती दिसून आल्याने काही पोलीसकमाअकडून व्यावसायिकांवर लाठीचार्ज करण्यात आला. यानंतर पोलीसांकडून संपूर्ण बाजारपेठ बंद करण्याचा प्रकार झाला. परिणामी, सर्वच व्यापारीवर्ग रस्त्यावर आला आणि विविध राजकीय नेत्यांच्या मागे उभा राहिला. त्यामुळे एकोपा गमावलेल्या या गटांना पांगविण्यात यशस्वी झालेल्या प्रशासनाबाबत पोलादपूर तालुक्यातील जनतेची 'पब्लीक क्राय आऊट' सारखी जनक्षोभाची परिस्थिती दिसून येत आहे.

मंगळवारी रात्रीपासून पोलादपूर पोलीसांची लॉकडाऊनसाठी मानसिकता उघड होऊन राहत्या घरालगतच दुकान असलेल्या भाजीविक्रेत्यांना



पोलीस ठाण्यात बोलावून घेण्यात आले होते. रात्री यासंदर्भात चर्चा सुरू असतानाच बुधवारी सकाळी पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातून पोलादपूर शहराकडे येणाऱ्या एस.टी.बसेस, जीप व मिनीडोर आदी वाहनांतून सकाळपासून बाजारहाटासाठी गर्दी सुरू झाली. पोलादपूर तालुक्यात पोलादपूर, लोहारे, कापडे बुद्रुक, पितळवाडी, सवाद, कातळी बंगला या ठिकाणी परिसरातील जनतेच्या बाजारहाटाची ठिकाणे आहेत. पण पोलादपूर शहरामध्ये बँका आणि अन्य सरकारी कार्यालये असल्याने पोलादपूर शहरातील तालुक्याचे ठिकाण म्हणून होणारी गर्दी वाढल्यानंतर पोलीसी खाक्या दाखवून तालुकाभर या कृतीद्वारे लॉकडाऊनच्या दहशतीचा संदेश पोहोचविण्याचा प्रकार पोलादपूर पोलीसांनी बाजारपेठेत तुडूंब गर्दी असताना दाखविला. मात्र, या सर्व प्रकारात सरकारी यंत्रणा कोरोना संसर्गावर कोठेही चर्चा अथवा उपाययोजनेवर भाष्य करताना दिसून येत नव्हती. त्यामुळे कोरोना संसर्गाबद्दल चर्चा न होता केवळ परिपत्रकातील जीवनावश्यक वस्तु व सेवांबाबत बोलणाऱ्या प्रशासनाला यापुढे सर्वसामान्यांचे जगणे हेच जीवनावश्यक असल्याचे भान राहिलेले दिसून येत नव्हते. यातून काही दुकानदारांवर लाठीचार्ज तर काही दुकानदारांच्या दुकानातील काचेच्या फर्निचरवर लाठीचार्ज झाल्याने संतापाची भावना वाढीस लागली. पोलादपूर शहरातील व्यापारी व अनेक व्यावसायिक पोलीस आणि प्रशासनाकडून दुकाने व व्यवसाय बंद करण्याच्या भूमिकेविरोधात जगण्याच्या संघर्षातून निवेदन देण्यासाठी निघाले असता पोलादपूर नगरपंचायत, पोलादपूर तहसिल कार्यालय आणि पोलादपूर पोलीस ठाण्याबाहेर पोहोचताना राजकीय आणि बिगरराजकीय गटांमध्ये व्यापारांचे विभाजन झाले आणि आधीच विभागलेल्या या जनक्षोभावर फक्त निवेदन स्विकारून मार्गी लावण्याइतपत नियंत्रण ठेवणे प्रशासनाला सोपे गेले.

पोलादपूर शहरातील व्यापाऱ्यांनी तहसिलदार दिप्ती देसाई यांच्याकडे निवेदन सादर केले असता महाड आणि पोलादपूर तालुक्यातील लॉकडाऊनबाबत महाड येथे सभा झाल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यासंदर्भात पोलादपूर तालुकावासियांना कल्पना देण्यात आली नव्हती, असे निवेदन देणाऱ्या व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. पोलादपूर नगरपंचायतीचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनाही या व्यापाऱ्यांनी निवेदन दिले असता कोणती दुकाने सुरू राहतील अथवा बंद राहतील, याबाबत स्पष्टपणे उदघोषणा करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी त्यांनी दिले. पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांना शिष्टमंडळाने निवेदन देऊन पोलीसांमार्फत व्यापारी तसेच सर्वसामान्य जनतेला कोणताही त्रास होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. पोलादपूर शहरातील नागरिक आणि व्यापारीवर्गाला पोलीसांना लाठीचार्ज करण्याचा आदेश कोणत्या कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी दिला, याबाबत प्रचंड कुतूहल दिसून आले.